स्टडी सर्कलद्वारा प्रकाशित

# स्पर्धा परीक्षा™

संपादक : डॉ. आनंद पाटील

नोकरी-संदर्भ

Nov 24 Wk 2

## डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष





A Study Circle Publication

# स्पर्धा परीक्षा नोकरी संदर्भ SPNS

The Title *"SPARDHA PARIKSHA NOKARI SANDHARBHA"* or *"SPARDHA PARIKSHA NOKARI SANDHARBHA GENERAL KNOWLEDGE"* is published by Dr. Anand B. Patil © for Study Circle Publication (P) Ltd. This magazine is a copyright. No part thereof shall be copied by anyone by any means without prior permission of the Publisher.

RNI NO. MAHBIL / 2003/10451

वर्ष : २२ WK-II किंमत १० रु.

नोव्हेंबर २०२४

अध्यक्ष आणि मानद संपादक
**डॉ. आनंद पाटील**

कार्यकारी आणि व्यवस्थापकीय संपादक
**सौ. वैशाली पाटील**

**ADVISORY COUNCIL**
Dr. Vijay Bhatkar, Prin. Vasantrao Wagh
Prin. Beena Inamdar, Vitthalrao Jadhav
**Satish Pawar**

**DESIGNAL & LAYOUT**
Study Circle Mumbai DTP Team

**EDITORIAL & HEAD OFFICE**
Editor, SPNS. 3-4, Amit Complex, 474/B, Opp. New English School, Tilak Road, Sadashiv Peth, Pune - 30. Phone No. 4486245.

**CORPORATE OFFICE**
Study Circle, 102, Deecan Vihar, B.S. Road, Dadar (W), Mumbai - 028.
Phone No. 24362656 Fax : 24325827.

*e-mail :* studycircleonline2020@gmail.com

*visit us at www.studycircleonline.com*

*© Strictly reserved with the Publishers*

## अंतरंग

■ संपादकीय ............................. ३
■ डोनाल्ड ट्रम्प ........................... ५
■ सीओपी २९ परिषद २०२४ ............ ९
■ अमेरिकेत स्थायिक .................. १२
■ शादमन चौक ......................... १३
■ RBI: KYC ........................... १४
■ एएमयूचा अल्पसंख्याक .............. १६
■ सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड ........ १८
■ ऑस्ट्रेलियात मुला-मुलींना सोशल ... २१
■ लंडन ते कलकत्ता .................... २४
■ इजिप्तची लेडी ऑफ दी हाऊस ....... २७
■ ब्लू झोन ............................... ३०

Printed by Dr. Anand B. Patil STUDY CIRCLE PUBLICATIONS PVT. LTD. at Navbharat Press, Polt No. 13, Sector-8, Sanpada (E), Navi Mumbai - 400 706.

संपादकीय

# सकारात्मक विचार... यशासाठी अनिवार्य

आयुष्यात प्रत्येकास आपले कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी खूप संधी मिळत असते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत जीवघणी स्पर्धा होती, आहे आणि राहणार आहे. जर तुम्ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या सबळ असाल तर स्पर्धेत फक्त टिकून न राहता सर्व संकटांवर ात करु शकाल. जो समर्थ असतो तोच सध्या जगात टिकू शकतो हे जरी खरे असले तरी शारीरिक सामर्थ्यापेक्षा मानसिक सामर्थ्य खूप महत्त्वाचे आहे. स्पर्धेत यशस्वी होण्याचे विचार सतत तुमच्या मनांत येत असतील आणि त्यावर तुमचा विश्वास असेल तर तुम्ही यशस्वी होण्याची अधिक शक्यता असते. अलीकडे घडलेल्या काही घटना पाहता त्याचा तरुण मनावर कोठेतरी खोलवर परिणाम होत आहे असे दिसते. समाज एक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे असे वाटते. स्पर्धात्मक जगात व्यक्तिवाद खूप महत्त्वाचा ठरल्याने यश प्राप्तीसाठी प्रत्येकजण प्रस्थापित मूल्यांपेक्षा 'झटपट यशमार्गाकडे' (Short Cuts) वळतांना दिसतो. दहावीपासून पदवीपर्यंतच्या परीक्षेस बसणाऱ्यांची संख्या खूपच वाढल्याने, स्पर्धा तीव्र झाल्याने व नैतिक मूल्यांत झपाट्याने होणाऱ्या घसरणीमुळे, एक प्रकारची असुरक्षिततेची भावना प्रत्येकाच्या मनात निर्माण होत आहे. स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांबाबतही हेच होत आहे. बरेच उमेदवार वयाच्या १९ – ३० च्या दरम्यान अनेक स्पर्धात्मक परीक्षा देत असतात. त्यांतील सुमारे ५०% सतत अपयशी ठरतात. फक्त ०.००१% च पहिल्या प्रयत्नांत उत्तीर्ण होतात. बाकीच्यांना दोन तीन तीन प्रयत्न करावे लागतात. त्यामुळे परीक्षा प्रणालीबाबत अनेक अफवा उठविल्या जातात. मला भेटलेले बरेच उमेदवार परीक्षाप्रणालीबाबत अनेक तक्रारी करीत असतात. स्पर्धा परीक्षा घेणाऱ्या बऱ्याच मंडळामध्ये अनेक हर्षद मेहता वसलेले आहेत. अशा स्वरूपांच्या त्यांच्या तक्रारी असतात. पण माझ्या वैयक्तिक अनुभव, परीक्षामंडळांशी संबंधित अधिकारी पदाधिकारी यांच्याबरोबरच्या चर्चेनुसार एवढेच सांगू इच्छितो की या सर्व गोष्टी चुकीच्या समजुतींवर आधारित असून कांही व्यक्ती तरुणांची दिशाभूल करून स्वत:चे महत्त्व वाढवीत असतात, आमच्याकडे मार्गदर्शन घेतलंत तर हमखास फौजदार

व्हाल असे सांगत असतात नवीन उमेदवारांची दिशाभूल करीत असतात. सबब आपण अशा व्यक्ती, संस्था, ॲकॅडमीपासून दूर राहून स्वबळावर यशस्वी होऊ शकता. मार्गदर्शन ही पूरक गोष्ट असून ती सर्वस्व नव्हे. मार्गदर्शनाशिवाय ही बरीच मुले यशस्वी झालेली आहेत. त्यासाठी हवी जिद्द, आत्मविश्वास व कठोर परिश्रमाची तयारी. याबाबतच्या अनेक मुलाखती आपल्या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या आहेत.

सध्या सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेत बरीच घसरण होत चालली आहे. मुंबईतील दंगली दरम्यान व बॉंबस्फोटादरम्यान जनतेची मन:स्थिती वेगवेगळ्या टोकाची होती. दंगली दरम्यान बरीच मध्यमवर्गीय मंडळी सुद्धा मिळाली म्हणून खूश होती तर बॉंबस्फोटादरम्यान त्यांच्यात असुरक्षितता निर्माण झाल्याने त्यांनी कधी नव्हे तेवढी एकमेकांबद्दल आपुलकी दाखवायला सुरु केली. ज्या झपाट्याने बॉंबस्फोटात मुंबईतील जनजीवन पुनर्पदावर आले त्यावरुन मुंबईतील माणुसकी व सामाजिक जागरुकता संपलेली नाही, याचा प्रत्यय आला पण यांत बरीच वाढ होणे गरजेचे आहे. Mock Interview साठी आमच्याकडे येणाऱ्या बऱ्याच उमेदवारांना आम्ही या संदर्भात प्रश्न विचारून त्यांचा याबाबतचा दृष्टिकोन चाचपण्याचा प्रयत्न केला त्यावेळी बराच चांगला अनुभव आला. ''आपण स्वत:स जबाबदार नागरिक समजता का?'' हा प्रश्न बहुसंख्य विद्यार्थ्यांना विचारल्यानंतर त्यांच्याकडून अपेक्षितपणे होय उत्तर मिळत गेल्यावर पुढचा प्रश्न होता ''मुंबई दंगली दरम्यान एक जबाबदार नागरिक म्हणून तुम्ही काय कामगिरी केली?'' आणि याची मिळालेली उत्तरे खूपच समाधानकारक होती. बऱ्याच जणांनी उपभोगवादापेक्षा कर्तव्यावर भर दिला. दिवसेंदिवस प्रशासन व्यवस्थेवर येणाऱ्या वाढत्या जबाबदारीमुळे व जोखमीमुळे त्यांत प्रवेश करु इच्छिणाऱ्यांवर सामाजिक बांधीलकीची भावना असणे खूप गरजेचे आहे. ज्यांच्याजवळ अशाप्रकारची प्रवृत्ती असते त्यांना, नियती, नशीब बरेच साथ देते. तुमच्यांत असणारा सकारात्मक दृष्टिकोन, समाजासाठी कांही तरी करण्याची जिद्द व सामाजिक बांधीलकीच्या तुमच्या यशापशांत खूप मोठा वाटा असतो.

**– डॉ. आनंद पाटील,**
**संचालक, स्टडी सर्कल**

# डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेच्या अध्यक्षपदी



चुरशीच्या लढतीविषयीचे सारे अंदाज फोल ठरवत रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ नोव्हेंबर २०२४ रोजी डेमोक्रॅटिक पक्षाच्या प्रतिस्पर्धी कमला हॅरिस यांचा सहज पराभव केला आणि दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष बनण्याचा मान मिळवला. महाभियोग, विविध फौजदारी खटले, बुद्धिजीवींकडून होणारी टीका, महिलांविषयी हीन टिप्पणी, हत्येचे प्रयत्न असे अनेक घटक ट्रम्प यांचा आत्मविश्वास तोडू शकले नाहीत आणि त्यांना असलेला जनाधार घटवू शकले नाहीत. अमेरिकेचे ४७ वे अध्यक्ष म्हणून ते जानेवारी महिन्यात शपथ घेतील.

गेल्या खेपेस डेमोक्रॅटिक पक्षाच्या ताब्यात असलेली पेनसिल्वेनिया, जॉर्जिया आणि विस्कॉन्सिन ही मोक्याची राज्ये (स्विंग स्टेट्स) ट्रम्प यांच्या झंझावाताने रिपब्लिकन पक्षाकडे खेचून आणली. त्यामुळे गेल्या वेळी जो बायडेन यांना या राज्यांतून मिळालेली ४५ प्रातिनिधिक मते (इलेक्टोरल वोट्स) ट्रम्प यांच्याकडे सरकली. ती निर्णायक ठरली.

याशिवाय नॉर्थ कॅरोलिना हे राज्य आपल्याकडेच राखण्यात त्यांनी यश मिळवले. हॅरिस यांच्या प्रचारयंत्रणेने लोकशाही, गर्भपात, अर्थव्यवस्था, ट्रम्प यांची महिलांविषयीची मते या मुद्द्यांवर भर दिला. पण स्थलांतरितांविषयी ट्रम्प यांनी उठवलेले रान, हत्येच्या प्रयत्नांमुळे त्यांना मिळालेली सहानुभूती, चाचपडत्या बायडेनना ऐनवेळी बदलून हॅरिस यांना उमेदवारी द्यावी लागल्यामुळे पुरेशा तयारीचा अभाव हे घटक रिपब्लिकन मतदारांवर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पाडून गेले. पारंपरिक ज्येष्ठ, गोरे, ग्रामीण व निमशहरी मतदार राखतानाच ट्रम्प यांनी लॅटिनो व आफ्रिकन पुरुष, पदवी नसलेला युवा वर्ग असे नवे मतदार जोडले. याउलट मोठ्या प्रमाणावर महिलांचा पाठिंबा विजयामध्ये परिवर्तित करण्यात कमला हॅरिस अपयशी ठरल्या. तसेच, त्यांना मुस्लीम मतदारांच्या रोषाचा फटकाही बसला. नव्याने आणि अचानक उमेदवारी स्वीकारावी लागल्यामुळे आर्थिक धोरणे, आंतरराष्ट्रीय धोरणे यांविषयी नेमकी भूमिका

मांडण्यात त्या अपयशी ठरल्या. आपली भारतीय–आफ्रिकी पार्श्वभूमी व त्या माध्यमातून स्थलांतरितांची यशोगाथा कथन करण्याचा त्यांचा पवित्रा ट्रम्प यांच्या टोकाच्या स्थलांतरितविरोधी प्रचारासमोर फिका पडला.

डेमोक्रॅटिक पक्षातर्फे या निवडणुकीत हॅरिस यांच्या रूपाने दुसऱ्यांदा महिला उमेदवारास संधी देण्यात आली. पण २०१६ मध्ये हिलरी क्लिंटन यांच्याप्रमाणेच यंदाही अमेरिकेच्या अध्यक्षपदी महिला निवडून येण्याची संधी हुकली.

ट्रम्प यांचा प्रचंड जनाधार आजही अबाधित असल्याचे या निवडणुकीच्या निमित्ताने दिसून आले. ६ जानेवारी २०२१ रोजी अमेरिकी काँग्रेसच्या कॅपिटॉल इमारतीवरील हल्ल्यास चिथावणी देऊन त्यांनी जनमताचा कौल उधळण्याचा आणि देशाची घटनात्मक प्रतीके उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्याविरोधात चार खटले सुरू आहेत. पण या कशाचाही परिणाम त्यांच्या मतदारांवर झाला नाही.

सलग तीन निवडणुकांमध्ये ट्रम्प लढले. त्यांतील दोन त्यांनी जिंकून दाखवल्या. दुसऱ्या प्रयत्नात ते अमेरिकेचे सर्वांत वयोवृद्ध अध्यक्ष म्हणून निवडून आले. यंदाच्या त्यांच्या विजयाचे वैशिष्ट्य म्हणजे, केवळ प्रातिनिधिक मते नव्हे तर प्रत्यक्ष मतेही त्यांना हॅरिस यांच्यापेक्षा अधिक मिळाली. २००४ नंतर प्रथमच अशा प्रकारे रिपब्लिकन उमेदवाराला डेमोक्रॅटिक प्रतिस्पर्ध्यापेक्षा अधिक मते मिळाली आहेत.

***हॅरिस यांच्या विरोधात –***

- गर्भपात, लोकशाहीविषयी थंड जनमत
- स्थलांतरितांबाबत प्रतिवादाचा अभाव
- महिलांकडून पुरेसे मतदान नाही
- मुस्लीम मतदारांचा रोष

***ट्रम्प यांच्या पथ्यावर –***

- स्थलांतरितविरोधी प्रचार
- रूढीवादी गोरे मतदार
- हल्ल्यातून बचावल्याने सहानुभूती
- अर्थव्यवस्थेविषयी प्रचार
- लॅटिनो, आफ्रिकन नवमतदार
- ट्रम्प यांच्याकडून मतदारांचे आभार
- अमेरिका प्रथम धोरणाचा भारतीय व्यापाराला फटका?
- ट्रम्प यांच्यावरील खटल्यांचे काय?

* अमेरिकेच्या राजकीय इतिहासात प्रथमच
* दुसऱ्या कार्यकाळातील धोरणांवर लक्ष
* पर्यावरणवादी चिंतेत
* जगभरातील नेत्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया

अमेरिकेचा सुवर्णकाळ आता परत येणार असून देशाच्या ङ्गजखमाफमी भरणार आहे. अमेरिकेला पुन्हा महान बनविण्यासाठी झालेला हा शानदार विजय आहे. अनेकांनी मला सांगितले, की देवाने मला एका कारणासाठी वाचविले आहे. ते कारण म्हणजे देशाला वाचविणे, पुन्हा महान बनविणे आता आपण हे उद्दिष्ट एकत्रितपणे साध्य करूया असे मत डोनाल्ड ट्रम्प यांनी व्यक्त केले.

तीन निवडणुकांमध्ये दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्षपद भूषवण्याचा मान मिळाल्यांतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यपद्धतीकडे संपूर्ण जगाकडे लक्ष असणार आहे. आपल्या प्रचारादरम्यान त्यांनी व्यापार, कररचना, नियमन, आंतरराष्ट्रीय प्रश्न, नागरी हक्क, अध्यक्षांच्या अधिकारांमध्ये वाढ अशा अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपली भूमिका स्पष्ट केली होती.

***स्थलांतरित –*** स्थलांतरितांच्या मुद्द्यावर ट्रम्प यांची भूमिका आक्रमक राहिली आहे. अमेरिकेत बेकायदा राहणाऱ्या स्थलांतरितांना कोणतीही दयामाया न दाखवता परत पाठवले जाईल असे त्यांनी अनेकदा सांगितले आहे. विशेषत: मेक्सिकोबाबत ते अधिक कठोर भूमिका घेण्याची शक्यता आहे.

***गर्भपात –*** ट्रम्प यांनी गर्भपाताविरोधात भूमिका घेतली आहे. अमेरिकेच्या गर्भपात करण्याच्या महिलेचा अधिकार संपुष्टात आणण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचेही त्यांनी श्रेय घेतले आहे. मात्र, यावेळी ट्रम्प यांच्या सांगण्यावरून रिपब्लिकन पक्षाने प्रचारामध्ये गर्भपातावर राष्ट्रव्यापी बंदी आणण्याचे आवाहन केले नाही.

***कर –*** ट्रम्प यांचे कर धोरण मुख्यत: उद्योजक आणि श्रीमंतांच्या बाजूने झुकलेले आहे. २०१७मध्ये त्यांनी कररचनेत बदल करण्याचे आश्वासन दिले होते. त्यामध्ये उद्योजकांवरील प्राप्तिकरामध्ये २१ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत कपात करण्याचा प्रस्ताव होता. बायडेन यांनी श्रीमंतांवर लादलेला वाढीव कर मागे घेण्याचा आणि जागतिक हवामान बदलाच्या संकटाशी लढा देण्यासाठी निधी प्रदान करण्याची तरतूद असलेला ङ्गइन्फ्लेशन रिडक्शन ॲक्टफ रद्द करण्याचाही त्यांचा विचार आहे.

***शुल्क आणि व्यापार –*** जागतिक व्यापारामुळे अमेरिकेच्या हितसंबंधांना धक्का बसतो अशी ट्रम्प यांची भूमिका आहे. परदेशी मालावरील शुल्क १० टक्क्यांवरून २०

टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा त्यांचा प्रस्ताव आहे. अमेरिकेच्या 'फूड अँड ड्रग अॅडमिनिस्ट्रेशन'ने केवळ अमेरिकी कंपन्यांकडूनच औषधे खरेदी करावी हा ऑगस्ट २०२० मधील कार्यकारी आदेश ते पुन्हा लागू करणार आहेत.

***एलजीबीटीक्यू व नागरी हक्क –*** एलजीबीटीक्यू नागरिकांचे कायदेशीर संरक्षण मागे घेणार असल्याचे तसेच सरकारी संस्थांमधील बहुविविधता, समानता आणि समावेशकतेचे कार्यक्रम रद्द करणार असल्याचे ट्रम्प यांनी सांगितले आहे. अशा संस्थांना निधी देण्याबद्दल पुनर्विचार करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. तृतीयपंथीयांच्या लढ्याबद्दलही त्यांचा दृष्टीकोन अनुदार आहे.

***नियमन, केंद्रीय नोकरशाही आणि अध्यक्षांचे अधिकार –*** सर्व आर्थिक क्षेत्रांमध्ये केंद्रीय नोकरशाहीची भूमिका आणि नियमन कमी करण्याचा ट्रम्प यांचा इरादा आहे. यामुळे आर्थिक समस्या दूर होतील असा त्यांचा दावा आहे. तसेच केंद्रीय खर्चावर केवळ अध्यक्षांचाच अधिकार असल्याचा त्यांचे म्हणणे आहे.

***शिक्षण –*** आपल्या प्रशासनातून शिक्षण विभाग पूर्णपणे हटवण्यावर ट्रम्प यांचा भर आहे. शिक्षकांसाठी गुणवत्तेनुसार वेतन आणि शिक्षणामधील बहुविविधता कार्यक्रम रद्द करणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्यांना केंद्रीय निधी मिळणार नाही अशी त्यांची स्पष्ट भूमिका आहे. उच्च शिक्षणामध्ये मार्क्सवाद्यांविरोधात गोपनीय हत्यार म्हणून मान्यता प्रक्रियेचा वापर केला जाईल.

***सामाजिक सुरक्षा, आरोग्य सेवा आणि आरोग्य मदत –*** वृद्ध अमेरिकींसाठी असलेल्या सामाजिक सुरक्षा आणि वैद्यकीय सेवांचे कार्यक्रम कायम राहतील असे ट्रम्प यांनी सांगितले आहे. मात्र, त्यांन्या प्रस्तावित करप्रणाली आणि वेतनपद्धतीमध्ये आरोग्य सेवेसाठी किती निधी खर्च केला जाईल हा प्रश्न आहे.

***हवामान आणि ऊर्जा –*** हवामान बदल ही संकल्पना फसवी असल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. स्वच्छ हवेसाठी जीवाष्म इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी बायडेन यांच्या काळात होणाऱ्या खर्चावर त्यांनी अनेकदा कठोर टीका केली आहे. वाहतूक आणि पायाभूत सुविधांसाठी जीवाष्म इंधनाचा वापर करण्याचा ते पुरस्कार करतात. त्यासाठी अधिकाधिक तेल व वायूचे उत्पादन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

***राष्ट्रीय संरक्षण आणि जगातील अमेरिकेची भूमिका –*** जागतिक पातळीवर अमेरिकेने अलगाववादी भूमिका घ्यावी यासाठी ट्रम्प आग्रही आहेत. इतर देशांमध्ये हस्तक्षेप न करणारे लष्करी व आर्थिकदृष्ट्या संरक्षणवादी धोरणाचा ते पुरस्कार करतात. त्याच वेळी लष्कराचा विस्तार करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# सीओपी २९ परिषद २०२४




**युक्रेन, इस्त्रायल कार्बन उत्सर्जनामध्ये वाढ –**

जागतिक हवामान बदलाविषयीची संयुक्त राष्ट्रांची सर्वात महत्त्वाची सीओपी२९ परिषद अझरबैजानच्या बाकू शहरात ११ नोव्हेंबर २०२४ रोजी सुरू झाली. परिषदेच्या पहिल्याच दिवशी युद्धादरम्यान वातावरणात हरितगृह वायूंचे उत्सर्जन लक्षणीय प्रमाणात वाढल्याचे सांगत युद्ध थांबवण्याची मागणी करत निदर्शने करण्यात आली.

पश्चिम आशियामध्ये ७ ऑक्टोबर २०२३ पासून इस्त्रायलचे एकाचवेळी गाझामध्ये हमासविरोधात आणि लेबनॉनमध्ये हेजबोलाविरोधात युद्ध सुरू आहे. तर रशिया आणि युक्रेनदरम्यानच्या युद्धाला पावणेतीन वर्षे होत आली आहेत. दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात प्राणहानी झाली आहे. तसेच गाझा जवळपास पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. मनुष्यहानीबरोबरच या सांपत्तिक नुकसानाचीही चर्चा होत असतानाच युद्धामुळे हवामान बदलाचे संकट वाढल्याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. हाच मुद्दा विविध एनजीओंनी परिषदेच्या पहिल्या दिवशी उपस्थित केला.

**युद्धामुळे वाढलेले उत्सर्जन –**

रशिया–युक्रेन युद्धाच्या पहिल्या दोन वर्षांमध्ये १७.५ कोटी टन कार्बन डायऑक्साईडसह इतर हरितगृह वायूंचे उत्सर्जन झाले असावे असा अंदाज आहे. त्यामध्ये पुनर्बांधणीमुळे होणाऱ्या उत्सर्जनाचाही समावेश आहे. पश्चिम आशियामधील युद्धामुळे आणखी किमान ५ कोटी टन हरितगृह वायूंचे उत्सर्जन झाल्याचा अंदाज आहे. या दोन युद्धांमुळे झालेले एकूण उत्सर्जनाची तुलना युक्रेन, इटली किंवा पोलंडच्या वार्षिक उत्सर्जनाबरोबर करता येईल असे हवामान संशोधकांनी सांगितले.

***हवामान अर्थपुरवठा आणि नुकसान निधी*** हे दोन मुद्दे कॉप २९ मध्ये अतिशय महत्त्वाचे ठरणार आहेत. २००९ साली कोपनहेगनमध्ये आयोजित परिषदेत विकसित राष्ट्रांनी विकसनशील देशांना हवामान बदलाशी लढण्यासाठी निधी (दरवर्षी १०० अब्ज डॉलर) देण्यास मूर्तस्वरूप दिले. २०१५ साली पॅरिस करार स्वीकारल्यानंतर याला २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता कॉप २९ मध्ये विकसित देशांनी हवामान वित्तपुरवठ्यासाठी नवीन सामूहिक परिमाणित लक्ष्य निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच हवामान बदलामुळे नुकसानीला तोंड देण्यासाठी कमकुवत देशांना सहकार्य करण्यासाठी नुकसान निधीला कॉप २९ मध्ये ठोस स्वरूप येणे अपेक्षित आहे. हवामान अर्थपुरवठा कृती निधी आणि नुकसान निधी हे दोन महत्त्वाचे मुद्दे कॉप २९ मध्ये असतील. आताच्या घडीला यात निधीची कमतरता आहे. या निधीसाठी आतापर्यंत जागतिक पातळीवर ६६१ दशलक्ष डॉलरची वचनबद्धता मिळाली आहे.

अतिवृष्टीच्या घटना आणि दुष्काळ यावर जागतिक तापमानवाढीचा कसा परिणाम होतो याची मांडणी क्लायमॅट ॲनालिटिक्स या संस्थेने केली आहे. जागतिक पातळीवर तापमानात १.७ अंश सेल्सिअसने वाढ झाल्यास अतिवृष्टीच्या घटनांमध्ये १.७ पटीने वाढ होईल. जर तापमानात चार अंश सेल्सिअसने वाढ झाली तर अतिवृष्टीच्या घटनांत २.७ टक्क्यांनी वाढ होईलच; शिवाय शेतीशी संबंधित दुष्काळ ४.१ टक्क्यांनी वाढलेला दिसून येईल. म्हणजेच हवामान बदल, त्यातून सुरू असलेली जागतिक तापमान वाढ यांचे चटके शेती आणि शेतकऱ्यांना बसणार आहेत. त्यामुळे हवामान बदलाला तोंड देण्यासाठी कृषी क्षेत्राला निधी, सुस्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे, शाश्वत कार्यपद्धतीचा स्वीकार आणि आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता यावर ठोस चर्चा होणे अपेक्षित आहे.

२०१५ मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या वार्षिक परिषदेत सर्वच देशांनी जीवाश्म इंधनाचा वापर कमी करण्यासाठी आणि २०३० पर्यंत वेगाने आणि प्रमाणात अक्षय ऊर्जा विकसित करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर ठरावीक योगदान देण्याचे वचन दिले. २०१७ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक हवामान बदलाच्या संकटाबाबत झालेल्या पॅरिस कराराशी जुळवून घेण्यास नकार दिला. हवामान बदल ही समस्याच नाही आणि त्यास अमेरिका जबाबदार कशी, असे ट्रम्प यांचे म्हणणे! जानेवारी २०२० मध्ये जो बायडेन यांनी अमेरिकी राष्ट्राध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतरच्या (ग्लासगो, शर्म-अल शेख व दुबईत झालेल्या कॉप २६ ते २८). नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ट्रम्प जिंकले असले, तरी त्यांचा कारभार जानेवारीत सुरू होईल; तेव्हा ते काय निर्णय घेतील याकडे लक्ष आहे.

जागतिक ऊर्जा संक्रमणाला गती देण्यासाठी कॉप २९ हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. कॉप २८ मध्ये शतकाच्या मध्यापर्यंत सर्व जीवाश्म इंधनांपासून दूर जाण्यासाठी राजकीय करार झाला. कॉप २९ ने आता नेत्यांनी या वचनबद्धतेच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतुदीसह ठोस योजनांमध्ये रूपांतरित केले पाहिजे. मात्र कॉप २८ मधील ऐतिहासिक राजकीय करारानंतरच्या वर्षभरात त्याविषयी कोणतीही प्रगती दिसून आलेली नाही. कॉप २९ मध्ये ऊर्जा संक्रमण अजेंड्याला प्राधान्य देऊन, नेत्यांनी हे दाखवून दिले पाहिजे की ते गेल्या वर्षीच्या वचनबद्धतेबद्दल (स्वच्छ, नवीकरणीय ऊर्जेत वाढ करून जीवाश्म इंधन टप्प्याटप्प्याने बंद करणे) ठाम आणि कृतिशील आहेत.

कॉप २९ आधीच वादग्रस्त ठरलेली आहे, कारण अझरबैजानची अर्थव्यवस्था जीवाश्म इंधनावर जास्त अवलंबून आहे आणि हवामान बदलाला कारणीभूत प्रमुख घटकांपैकी जीवाश्म इंधन हा एक घटक आहे. अझरबैजान कॉप २९चे अध्यक्षस्थान भूषवत आहे. अशा वेळी जीवाश्म इंधने टप्प्याटप्प्याने बाहेर टाकण्याच्या दिशेने ते काय पावले उचलतात हे महत्त्वाचे आहे. हाच वाद गेल्या वर्षी दुबईतसुद्धा उद्‌भवला होता. पण अझरबैजान भ्रष्टाचाराच्या निर्देशांकातदेखील उच्च स्थानावर आहे. त्याहीपेक्षा वाईट म्हणजे, पर्यावरण कार्यकर्त्यांना कैदेत टाकणे, पर्यावरण–संबंधी मुद्द्यांचा प्रचारप्रसार करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांवर, तसेच व्यापक नागरी समाजावर आणि कलाकारांवर निर्बंध घालणे, असले प्रकारसुद्धा अझरबैजानने वारंवार केलेले आहेत.

# अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी चढाओढ



विदेशात नोकरी मिळवायची आणि तिथेच स्थायिक व्हायचे ही स्वप्ने अनेक भारतीय तरुण पाहत असतात. युरोप, ऑस्ट्रेलिया आणि अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर भारतीय नागरिक स्थलांतरीत होत असतात. विशेषतः अमेरिकेत आसरा मागणाऱ्या भारतीय नागरिकांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मागच्या तीन वर्षांत अमेरिकेत आसरा मागणाऱ्यांच्या संख्येत ८५५ टक्क्यांची वाढ झाली आहे. यूएस डिपार्टमेंट ऑफ होमलँड सिक्युरिटीने दिलेल्या माहितीनुसार २०२१ साली ४,३३० भारतीय नागरिकांनी आश्रय मागण्यासाठी अर्ज केला होता. त्यानंतर २०२३ आर्थिक वर्षात ही संख्या वाढून तब्बल ४१,३३० लोकांनी अमेरिकेत आसरा मागितला आहे. भारतीय यंत्रणेने सांगितले की, यातली बहुसंख्य अर्जदार हे गुजरातमधील आहेत.

रक्षात्मक आश्रय मागणाऱ्या भारतीय नागरिकांची संख्या पाचव्या क्रमाकांवर आहे. ऑक्टोबर महिन्यात होमलँड सिक्युरिटी विभागाने जाहीर केलेल्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ४१,३३० अर्जदारांपैकी ५,३४० अर्ज पात्र ठरले होते.

अमेरिकेच्या नागरिकता आणि इमिग्रेशन सर्विसेसला आर्थिक वर्ष २०२१ मध्ये आसरा मागणारे ४,३३० अर्ज प्राप्त झाले होते. यामध्ये अफरमेटिव्ह अर्ज २०९० तर डिफेन्सिव अर्ज २,२४० होते. तर २०२२ मध्ये हा आकडा वाढला. यावर्षात एकूण १४,५७० अर्ज प्राप्त झाले.तर २०२३ मध्ये हा आकडा ८५५ टक्क्यांनी वाढून ४१,३३० वर पोहोचला.

अहवालानुसार २०२१ साली एकूण १,३३० भारतीयांना अमेरिकेत शरण मिळाली. तर २०२२ साली ही संख्या तीन पटींनी वाढून ४,३६० भारतीयांना अमेरिकेत आसरा मिळणार. तर तिसऱ्या वर्षी म्हणजे २०२४ मध्ये ५,३४० जणांचे अमेरिकेत स्थायिक होण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

# शादमन चौक, पाकिस्तान



भगतसिंह फाऊंडेशनने काही दिवसांपूर्वी लाहोरमधील शादमन चौकाला भगत सिंहांचे नाव देण्याची तसेच या चौकात भगत सिंह यांचा पुतळा उभारण्याची मागणी लाहोर जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने निवृत्ती लष्करी अधिकारी तारिक मजीद यांच्या नेतृत्वाखील एका समितीची स्थापना केली होती.

या समितीने त्यांचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर केला. यात त्यांनी शादमन चौकाला भगत सिंहांचे नाव देऊ नये अशी शिफारस केली. भगत सिंह हे क्रांतीकारी नव्हते, तर ते गुन्हेगार होते. आजच्या भाषेत बोलायचे झाल्यास, ते एक दहशतवादी होते. त्यांनी एका ब्रिटीश पोलीस अधिकाऱ्याची हत्या केली होती. त्यासाठी त्यांना त्यांच्या दोन सहकाऱ्यांबरोबर फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यामुळे या चौकाला अशा व्यक्तीचे नाव देऊ नये आणि त्यांचा पुतळा उभारू नये, असे त्यांनी अहवालात म्हटले.

या अहवालात त्यांनी भगत सिंह फाऊंडेशनवरही गंभीर आरोप केले. या संस्थेचे अधिकारी स्वत:ला मुस्लीम म्हणवून घेतात. पण ही संस्था मुस्लिमांच्या तसेच पाकिस्तानी संस्कृतीच्या विरोधात काम करते आहे. त्यामुळे या संस्थेवर बंदी आणावी, अशी शिफारस त्यांनी या अहवालात केली.

# RBI : KYC नियम बदलण्याची घोषणा




रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने नुकतीच KYC म्हणजे नो युअर कस्टमरसाठी नवी नियमावली आणली आहे. ज्यामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. आर्थिक व्यवहारांमध्ये अफरातफर होऊ नये यासाठी नियम बदलण्यात आले आहेत. या नव्या बदलांमुळे ग्राहकांची ओळख पटवणं आणखी सोपं होणार आहे.

KYC चा सोपा अर्थ Know Your Customer असा आहे. यामध्ये तुमचं नाव, ओळख, घराचा पत्ता हे सगळे तपशील असतात. बँक खाते उघडण्यासाठी KYC आवश्यक असते. मनी लाँड्रिंग, टेरर फंडिंग हे प्रकार रोखण्यासाठी KYC संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वं लागू केली आहेत. ज्यातील बदलांनुसार तुम्हाला (ग्राहकांना) आता सध्याच्या छायाचित्रासह राहत्या घराचा पत्त्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. या पुराव्यांमध्ये वाहन चालवण्याचा परवाना, पासपोर्ट, मतदार ओळखपत्र, पॅन कार्ड आदींचा समावेश आहे. याची छायाप्रत तुम्हाला बँकेत द्यावी लागणार आहे.

***डिजिटल KYC*** – डिजिटल KYC ही सेवा बँकांनी उपलब्ध करुन दिली आहे. ज्यानुसार ग्राहक बँकेशी ऑनलाइन संपर्क साधून आपला लाइव्ह फोटो देऊ शकतात. तसंच आधार कार्डसारखी कागदपत्रंही याद्वारे जमा करता येऊ शकतात. ज्या भागात तुम्ही राहताय त्या इमारतीचा फोटोही तुम्ही अपलोड करु शकता. हे अपडेट केल्याने तुमचं खातं आणखी सुरक्षित राहण्यास मदत होते.

**KYC च्या नियमांमधील महत्त्वाचे बदल –**

- बँक किंवा अर्थ पुरवठा करणाऱ्या संस्था आता अकाऊंट ओपन करतानाच केवायसीची पूर्तता करुन घेत आहेत.

* ज्या खात्यांबाबत हाय रिस्क वाटते आहे अशी खात्यांवर खास नजर ठेवण्यात येते आहे.
* ठराविक कालावधीनंतर KYC अपडेट करण्याचा पर्यायही उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

नव्या नियमांनुसार सेंट्रल केवायसी रेकॉर्ड रजिस्ट्रीला वित्तीय संस्थांनी अद्ययावत माहिती असलेला केवायसी सामायिक करणे आवश्यक आहे. बँका, अर्थविषयक संस्था यांना अपडेटेड केवायसी मिळाल्यानंतर पुढील सात दिवसात तो सेंट्रल केवायसी रजिस्ट्रीशी सामायिक करणे आवश्यक आहे. केवायसी आयडेंटिफायरचा वापर करुन वित्तीय संस्था ग्राहकाचा केवायसी पुन्हा मिळवू शकतात. त्यामुळे तीच कागदपत्रे पुन्हा सबमिट करण्याची आवश्यकता राहात नाही.

केवायसी नियमांमधले हे बदल केवायसी प्रक्रिया सोपी आणि सुलभ करण्यासाठी केले गेले आहेत. संस्थांमध्ये एक सेफ डेटा त्यामुळे तयार होतो. तसंच आर्थिक अफरातफरींना आळा घालण्यासाठी याची मोलाची मदत होणार आहे. बँकेचे ग्राहक म्हणून तुम्ही अधिक जलदगतीने तुमचे बँक खाते उघडू शकता. तसेच सदर नव्या नियमांमुळे केवायसीची माहिती भरतानाची प्रकिया साधी सोपी होते. ग्राहक सुरक्षा हा या बदलांचा सर्वात मोठा फायदा आहे.

●●●

# एएमयूचा अल्पसंख्याक दर्जा कायम



अलिगढ मुस्लीम विद्यापीठाच्या (एएमयू) अल्पसंख्याक दर्जाविषयीचे प्रकरण नियमित खंडपीठाकडे पाठविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून घेण्यात आला आहे. याबरोबरच विद्यापीठाची स्थापना केंद्रीय कायद्यानुसार न झाल्याने हे विद्यापीठ अल्पसंख्याक संस्था मान्य करता येत नाही, हा १९६७ चा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने रद्द केला. त्यामुळे तूर्तास विद्यापीठाचा अल्पसंख्याक दर्जा कायम राहिला आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी ४:३ या बहुमताच्या निर्णयात अल्पसंख्याक दर्जाविषयीचे मुद्दे विचारार्थ मांडताना मापदंडही निश्चित केले. यावेळी झालेल्या सुनावणीवेळी खंडपीठातील न्या. संजीव खन्ना, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांनी एकमताने तर न्या. सूर्य कांत, न्या. दीपांकर दत्ता, न्या. सतीशचंद्र शर्मा यांनी मतभिन्नता दर्शविली.

एएमयू ही अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था आहे की नाही या प्रश्नावर या निकालात नमूद केलेल्या तत्त्वांच्या आधारे निर्णय घेतला पाहिजे, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २००६ च्या निकालाविरुद्धच्या अपिलांवर निर्णय घेता यावा यासाठी सरन्यायाधीशांनी न्यायालयीन रेकॉर्ड नियमित खंडपीठासमोर सादर करण्याचे निर्देश दिले.

* एएमयूच्या अल्पसंख्याक दर्जाचा मुद्दा दोन दशकांपासून कायदेशीररीत्या अडकला आहे. सर्वोच्च न्यायालयाने १२ फेब्रुवारी २०१९ रोजी वादग्रस्त मुद्दा सात न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवला होता आणि यापूर्वी १९८१ मध्येही असाच संदर्भ दिला होता.

* एएमयू (सुधारणा) कायदा १९८१ मध्ये संसदेने मंजूर केल्यावर संस्थेने तिचा अल्पसंख्याक दर्जा परत मिळवला. केंद्रातील काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संपुआ सरकारने

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २००६च्या निर्णयाविरोधात अपील दाखल केले होते, तर विद्यापीठाने त्याविरोधात स्वतंत्र याचिका दाखल केली होती.

✻ भाजपच्या नेतृत्वाखालील रालोआ सरकारने २०१६ मध्ये बाशा प्रकरणात १९६७ च्या निकालाचा दाखला देत एएमयू ही अल्पसंख्याक संस्था नाही; कारण ती सरकारद्वारे अर्थसहाय्यित केंद्रीय विद्यापीठ आहे, असा युक्तिवाद केला होता.

***घटनापीठाचा तोफनिर्णय –*** जर एखाद्या शैक्षणिक संस्थेने कायद्याद्वारे त्याचे वैधानिक वैशिष्ट्य प्राप्त केले तर ती अल्पसंख्याकांद्वारे स्थापित केली जात नाही, ती बाद ठरवली जाते, असे अजीज बाशा विरुद्ध भारत या प्रकरणात १९६७ मध्ये निवाडा करण्यात आला होता.

***मतभिन्नता –*** अल्पसंख्याकांना शिक्षण आणि ज्ञानासाठी सुरक्षित जागेची गरज असल्याचे पूर्णत: चुकीचे आहे. कोणताही कायदा अथवा प्रशासकीय कारवाई शैक्षणिक संस्थांची स्थापना अथवा प्रशासनात धार्मिक अथवा भाषक अल्पसंख्याकांविरोधात भेदभाव करीत असेल तर ते घटनेतील कलम ३० (१) विरोधात आहे. – न्या. सतीश चंद्र शर्मा

उद्या दोन न्यायाधीशांचे खंडपीठ म्हणेल की मूळ रचनेबद्दल (केशवानंद भारती निर्णय) शंका आहे. बहुमताचा कौल मान्य केल्यास नेमके हेच होईल. तसे झाले तर तो धोकादायक उदाहरण ठरेल. – न्या. दीपांकर दत्ता

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने प्रकरण सात न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे पाठवणे योग्य नाही. – न्या. सूर्य कांत

२००६ साली अलाहाबाद उच्च न्यायालयात या प्रकरणी सुनावणी झाली असताना अलीगढ मुस्लीम विद्यापीठ ही अल्पसंख्याक संस्था नसल्याचा निकाल देण्यात आला होता. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली, त्यावर आज चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सुनावणी घेतली.

भारतातील प्रमुख विद्यापीठांपैकी एक असे हे विद्यापीठ आहे. याची सुरुवात १८७५ साली झाली होती. ब्रिटिश काळात केम्ब्रिज विद्यापीठाच्या धरतीवर भारतात अलीगढ मुस्लीम विद्यापीठाची उच्च शिक्षणासाठी स्थापना करण्यात आली होती. १८७५ साली सर सय्याद यांनी मुस्लिमांना आधुनिक शिक्षण देण्यासाठी मुस्लीम अँग्लो ओरिएंटल स्कूलची स्थापना केली. त्यावेळी खासगी विद्यापीठांना परवानगी नव्हती. त्यामुळे आधी शाळेच्या स्वरुपात विद्यापीठ सुरू करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालय आणि १९२० साली अलीगढ मुस्लीम विद्यापीठाचा दर्जा दिला गेला.

# सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड निवृत्त



न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड हे आता निवृत्त होत आहेत. ८ नोव्हेंबर २०२२ रोजी देशाचे ५० वे सरन्यायाधीश म्हणून त्यांनी शपथ घेतली होती. धनंजय चंद्रचूड यांचे वडील दिवंगत वाय. व्ही. चंद्रचूड हेदेखील देशाचे सरन्यायाधीश होते. वाय. व्ही. चंद्रचूड यांनी ७ वर्षे देशाचे सरन्यायाधीश म्हणून न्यायदान केलेले आहे. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड यांनी २ वर्षांच्या कार्यकाळात तब्बल १,२७५ खंडपीठाच्या सुनावणीत सहभाग घेतला. ६१३ निकालांचे लिखाण त्यांनी केले, तर ५०० खटल्यांमध्ये ते स्वत: न्यायमूर्ती होते, अशी माहिती सुप्रीम कोर्ट ऑब्जर्व्हर या संकेतस्थळावर मिळते. धनंजय चंद्रचूड यांच्या काळात सर्वोच्च न्यायालयात डिजिटायजेशनला वेग आला. न्यायप्रक्रिया अधिक युझर फ्रेंडली झाली. निवृत्त होताना त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या संग्रहालयाचे उद्घाटन केले. या ठिकाणी एआय वकील उभारण्यात आला आहे, जो कायद्याच्या जटील बाबी सोप्या पद्धतीत समजावून सांगतो.

न्या. धनंजय चंद्रचूड यांचा जन्म ११ नोव्हेंबर १९५९ रोजी झाला. त्यांचे वडील वाय. व्ही. चंद्रचूड हे भारताचे १६ वे सरन्यायाधीश होते. त्यांची आई प्रभा चंद्रचूड या ऑल इंडिया रेडिओच्या गायिका होत्या. चंद्रचूड यांनी दिल्लीच्या सेंट स्टीफन्स कॉलेजमधून अर्थशास्त्र आणि गणित या विषयात पदवी प्रदान केली होती, तर १९८२ रोजी त्यांनी दिल्ली विद्यापीठातून कायद्याची पदवी घेतली. १९८३ साली त्यांनी हार्वर्ड विद्यापीठातून एलएलएमची पदवी घेतली, तर हार्वर्ड विद्यापीठातूनच त्यांनी ज्युरीडिकल सायन्सेसची डॉक्टरेट मिळविली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्रमध्ये वकील म्हणून प्रवेश घेतला.

वकील म्हणून काम करत असताना चंद्रचूड यांनी १९८८ ते १९९७ या काळात मुंबई विद्यापीठात कायद्याचे प्राध्यापक म्हणून शिक्षण देण्याचे काम केले. १९९८ मध्ये त्यांना अवघ्या ३८ व्या वर्षी वरिष्ठ अधिवक्ता म्हणून नियुक्त करण्यात आले होते. पुढे भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणूनही त्यांनी काम केले. २९ मार्च २००० रोजी ते मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश बनले. मुंबई उच्च न्यायालयात त्यांनी २०१३ पर्यंत काम केले. त्यानंतर २०१३ ते २०१६ या काळात ते अलाहाबाद उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश होते. तसेच २०१६ ते २०२२ पर्यंत त्यांनी सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम पाहिले.

***सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचे महत्त्वाचे निकाल –***

१) गोपनियतेचा मूलभूत अधिकार । नऊ न्यायाधीशांचे खंडपीठ

न्या. केएस पुट्टास्वामी वि. भारतीय संघराज्य

२४ ऑगस्ट २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या खंडपीठाने एकमताने गोपनियतेला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता दिली. निवृत्त न्यायाधीश केएस पुट्टास्वामी यांनी २०१२ साली केलेल्या याचिकेतून हे प्रकरण समोर आले होते. आधार कायद्याच्या घटनात्मक वैधतेला त्यांनी आव्हान दिले होते. खंडपीठाच्या वतीने न्या. चंद्रचूड यांनी सांगितले की, घटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये गोपनियतेचा अधिकार जगण्याच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या हक्कांपैकी एक आहे, जो घटनेने भाग तीनमध्ये दिलेल्या हमीमध्ये मोडतो.

२) समलैंगिकतेला गुन्हा ठरविणे । पाच न्यायाधीशांचे खंडपीठ

नवतेज सिंग जोहर वि. भारतीय संघराज्य

६ सप्टेंबर २०१८ रोजी पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने भारतीय दंड संहिता, १८६० मधील (आयपीसी) कलम ३७७ अंशतः रद्द केले. या कलमाद्वारे प्रौढांमध्ये संमतीने झालेले लैंगिक संबंध गुन्ह्याच्या कक्षेत येत होते. खंडपीठाने नमूद केले की, यापुढे हे कलम केवळ पाषविकतेशी संबंधित लागू राहील.

३) अयोध्या प्रकरणाचा निकाल । पाच न्यायाधीशांचे खंडपीठ

एम. सिद्दिक वि. मंहत सुरेश दास

९ नोव्हेंबर २०१९ रोजी न्या. चंद्रचूड यांचा समावेश असलेल्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने एकमताने अयोध्येमधील विवादित जमीन ही श्री राम जन्मभूमि मंदिरासाठी प्रदान केली. तसेच उत्तर प्रदेश सरकारला निर्देश देऊन सुन्नी वक्फ बोर्डाला मशीद बांधण्यासाठी इतरत्र जमीन देण्याचे निर्देश दिले

*न्या. चंद्रचूड यांनी शेवटच्या दिवशी दिला महत्त्वाचा निकाल* – अलीगढ मुस्लीम विद्यापीठ हे अल्पसंख्यांक असल्याचा दावा करू शकत नाही, हा १९६७ साली सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने स्वतःच बदलला. अलीगढ मुस्लीम विद्यापीठ हे अल्पसंख्यांक आहे की नाही? हे ठरविण्यासाठी आता तीन न्यायमूर्तींचे वेगळे खंडपीठ स्थापन केले जाणार आहे. १९६७ साली अझीज बाशा विरुद्ध भारतीय संघराज्य या खटल्याचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, अलीगढ मुस्लीम विद्यापीठ कायद्याद्वारे स्थापन झाले असल्यामुळे ते अल्पसंख्यांक दर्जा मिळविण्यासाठी दावा करू शकत नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपलीच जुनी भूमिका बदलली. सरकारने नियमन आणि शासन करण्यासाठी आणलेल्या कायद्यामुळे एखाद्या संस्थेला त्यांचा अल्पसंख्याक दर्जा गमावता येणार नाही, असा निकाल सात न्यायमूर्तींच्या खंडपीठाने ४:३ अशा बहुमताने दिला.

# ऑस्ट्रेलियात मुला-मुलींना सोशल मीडिया वापरास बंदी




तसे पाहता मुलांच्या हाती खेळण्याची जागा मोबाइल फोनने कोविड काळापूर्वीच घेतली होती. पण त्या वापराला काहीशी शिस्त होती. शाळांमध्ये मोबाइल नेण्यास सक्त मनाई होती. पण कोविडमध्ये ऑनलाइन शिक्षण घेत असताना मुलांच्या हाती मोबाइल आला तो हातातच राहिला इतका की त्यातल्या सोशल मीडिया ॲपच्या मुले आहारी गेली. दरम्यानच्या काळात समाजमाध्यमांची व्यासपीठेही वाढली आणि लोकांना गुंतवून ठेवण्याच्या कल्पक युक्तींनीही जन्म घेतला होता. यातूनच फेसबुक, ट्विटरच्या पुढे जात टिकटॉक, इन्स्टाग्राम रील्सचा भडीमार वाढला. मुले (आणि मोठेही) तासन् तास या रील्सच्या जाळ्यात अडकून पडू लागली आहेत. याच चिंतेतून ऑस्ट्रेलियाने १६ वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमे वापरण्यावर बंदी आणणार असल्याची घोषणा केली.

समाजमाध्यमांच्या अति वापरामुळे मुलांच्या भावनिक विश्वात हलकल्लोळ माजला आहे. अनेक गोष्टी त्यांना त्यांच्या वयाच्या खूप आधी समजू लागल्या आहेत. त्यांची अभ्यास, खेळ आदींमधील कार्यशीलता कमी झाली आहे. दिवसाचा खूप मोठा कालावधी रील्स नावाच्या वेळखाऊ कामात जाऊ लागला आहे. शिवाय सायबर सुरक्षेसारखे मुद्देही ऐरणीवर आले आहेत. जगभरातल्या अनेक देशांना मुलांच्या सोशल मीडियाच्या अति वापराच्या दुष्परिणामांची चिंता सतावू लागली आहे. पुढील पिढी किती कृतीशील (प्रोडक्टिव्ह), सर्जनशील, उद्यमशील असते त्यावर देशाचा विकास अवलंबून असतो. त्यामुळे सोशल मीडियाचा मुलांकडून होणारा अतिवापर हा सामाजिक जडणघडणीशी संबंधित विषय देशाच्या चिंतेचा विषय असायलाच हवा. पण दुर्दैवाने अनेक देशांनी तो नीट हाताळलेला नाही किंवा तसे ठोस प्रयत्न केलेले नाहीत. म्हणूनच ऑस्ट्रेलिया सरकारने घेतलेला निर्णय महत्त्वाचा आहे.

देशातील १६ वर्षांखालील मुलांना समाजमाध्यमाच्या वापरावर बंदी घालण्याचा धोरणात्मक निर्णय ऑस्ट्रेलियाने घेतला आहे. यासाठी कायदा केला जाणार आहे. विशेष म्हणजे प्रमुख विरोधी पक्षाने – लिबरल पक्षाने – या निर्णयाला पाठिंबा दर्शवला आहे. त्यामुळे हा निर्णय अमलात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाच्या कठोर अंमलबजावणीस त्या–त्या माध्यम वा सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला जबाबदार धरण्यात येणार आहे. पंतप्रधान अँथनी अल्बानीस यांनी या निर्णयाची घोषणा केली. समाजमाध्यमे आपल्या मुलांचे नुकसान करत आहेत, असे ते म्हणाले. म्हणजेच समाजमाध्यमाचा वापर करताना वयोमर्यादा ओलांडली गेली तर कंपन्यांवर कारवाई होणार आहे, मुले आणि पालकांवर कारवाई केली जाणार नाही. समाजमाध्यम वापराचे वय निश्चित करण्यासाठी कायदा केला जाणार आहे. १८ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या अधिवेशन सत्रातील अंतिम दोन आठवड्यांत विधेयक आणले जाणार आहे. त्याचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी आणखी वर्षभराचा कालावधी जाईल, अशी माहिती अल्बानीस यांनी दिली.

एक्स (ट्विटर), टिकटॉक, इन्स्टाग्राम आणि फेसबुक या समाजमाध्यमांच्या वापरासाठी आता १६ वर्षांची वयोमर्यादा घालून देण्यात येणार आहे. १६ वर्षांखालील मुले या माध्यमांचा वापर करणार नाहीत, यासाठी काय प्रणाली राबवायची ते ठरविण्यासाठी या माध्यमांना हा कायदा होण्यापर्यंतचा वर्षभराचा कालावधी मिळणार आहे.

वयोमर्यादेच्या या निर्णयाचे वर्णन ऑस्ट्रेलियातील डिजीटल इंडस्ट्री ग्रुप इनकॉर्पोरेशन या डिजिटल इंडस्ट्रीतील प्रमुख कंपनीने एकविसाव्या शतकातील आव्हानांना विसाव्या शतकातील प्रतिसादफ असे केले आहे. या कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक सुनीता बोस यांनी एका निवेदनात म्हटले आहे की अशा पद्धतीने सोशल मीडियाच्या वापरावर बंधने घालण्यापेक्षा आपल्याला समाजमाध्यमांमध्ये वयोमानानुसार जागा तयार करणे, डिजीटल साक्षरता निर्माण करणे आणि मुलांचे ऑनलाइन नुकसानीपासून संरक्षण करणे असे उपाय योजून एक संतुलित दृष्टिकोन तयार करण्याची गरज आहे.

बाल कल्याण आणि तंत्रज्ञानाशी संबंधित क्षेत्रातील १४० हून अधिक ऑस्ट्रेलियन आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणतज्ज्ञांनी अल्बानीस यांना गेल्या महिन्यात एक खुले पत्र लिहून या वयोमर्यादेच्या निर्णयाला विरोध केला आहे. हा उपाय खूपच बोथट असल्याचे या तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

रिच आऊट नावाच्या तरुणांसाठीच्या मानसिक आरोग्यविषयक संस्थेच्या संचालक जॅकी हॅलन यांनी या निर्णयाला आक्षेप घेत एका वेगळ्या मुद्द्याकडे लक्ष वेधले. ऑस्ट्रेलियातील ७३ टक्के मुलांचे सोशल मीडियाद्वारे मानसिक आरोग्यविषयक आधारगट आहेत. अर्थात अल्बानीस यांनी निर्णय जाहीर करताना हेही म्हटले आहे की शैक्षणिक सेवा आणि अन्य असे ॲक्सेस मुलांना अपवाद असतील.

***भारतातील स्थिती –*** फेसबुकवर लॉगइन करण्यासाठी मेटानेच १३ वर्षांची वयोमर्यादा आखून दिलेली आहे. तरीही १३ वर्षांपेक्षा कमी वयाची मुले खोट्या माहितीच्या आधारे फेसबुक लॉगइन करत आलेली आहेत. भारतही याला अपवाद नाही. इन्स्टाग्रामचे रील्स पाहण्यासाठी मुले आईवडिलांचे लॉगइन सर्रास वापरत आहेत. नसेल तर आईवडिलांचा फोन बिनदिक्कत खेचून घेत आहेत. न कळत्या कोवळ्या मुलांना आजी–आजोबांच्या गोष्टींऐवजी यूट्युबवरचे कार्टून्स दाखवणारे पालक आपल्या देशात संख्येने कमी नाहीत (सुजाण पालकांचा अपवाद). गेमिंगची तर वेगळीच दुनिया आहे. मुले सापशिडी आणि ल्युडोसारखे खेळही एकत्र जमून ऑनलाइन खेळतात! मैदानात खेळायला पाठवले तरी तिथे मुले झाडाखाली बसून ऑनलाइन गेम खेळली तरी आश्चर्य वाटायला नको.

समाजमाध्यमांवर तर धुमाकूळ सुरू आहे. विखारी विचार पसरविण्यासाठी व्हॉट्सॲप, ट्विटर, फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्यूबचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असताना अनेकदा अल्पवयीन मुले त्याला बळी पडताना दिसतात. मात्र आपल्या देशात अद्याप समाजमाध्यमांवरील वयोमर्यादेचे बंधन हा विषय कोणत्याही राज्यात, केंद्रात विचाराधीन नाही. तशी चर्चा नाही. महाराष्ट्रात तर रात्री मुले उशिरा झोपी जातात म्हणून सकाळच्या शाळा उशिरा भरवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय मुलांच्या झोपेसाठी पोषक आहे की रात्री जागून पालकांसह ऑनलाइन राहण्यासाठी हातभार लावणारा आहे हे तो निर्णय घेणारेच जाणोत.

●●●

# लंडन ते कलकत्ता : सर्वाधिक लांबीचा बससेवा मार्ग




प्रवास हा मानवी आयुष्याचा अविभाज्य भाग आहे, मग हा प्रवास कुठला का असेना. मग तो बसने केलेला प्रवास असो किंवा विमानाने; त्याचे महत्त्व त्या त्या क्षणांपुरते असतेच. बसचा प्रवास हा अनेकांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असतो, रोजचा प्रवास म्हणा किंवा दूरदेशी जाण्यासाठी बसने केलेला प्रवास असो. परंतु एखाद्या बसने किती लांबचा प्रवास घडू शकतो? फारतर देशांतर्गत किंवा शेजारील देशांपर्यन्त. परंतु जगाच्या इतिहासातील सर्वात लांबचा प्रवास हा भारतातील कलकत्त्यापासून (आताचे कोलकाता) ते लंडन दरम्यानचा आहे.

***१९५७ मध्ये सुरू झाली बससेवा*** – लंडन (इंग्लंड) ते कलकत्ता (भारत) (आता कोलकाता) दरम्यानची बस सेवा जगातील सर्वांत लांबलचक बसमार्ग असेलली सेवा म्हणून ओळखली जात असे. १९५७ मध्ये सुरू झालेल्या या बससेवेचा मार्ग बेल्जियम, युगोस्लाव्हिया आणि वायव्य भारतातून जात असे. या मार्गाला *हिप्पी रूट* असेही म्हटले जात असे. या प्रवासाचे एकमार्गी अंतर १० हजार मैल (१६ हजार किमी) तर परतीसाठी २० हजार ३०० मैल (३२ हजार ७०० किमी) होते. ही सेवा चक्क १९७६ पर्यंत कार्यरत होती.

***पहिला प्रवास ५० दिवसांचा*** – १९५७ साली या एकमार्गी प्रवासाचा खर्च ८५ पाऊंड होता. या रकमेत अन्न, प्रवास आणि निवास यांचा समावेश असे. ही बस सेवा अल्बर्ट ट्रॅव्हलद्वारे चालवली जात असे. पहिला प्रवास १५ एप्रिल १९५७ रोजी लंडनहून सुरू झाला. ही बस सेवा पहिल्यांदा ५ जूनला, म्हणजेच ५० दिवसांनी, कलकत्त्यात पोहोचली. या प्रवासात बस इंग्लंडहून बेल्जियमला गेली, आणि त्यानंतर

पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रिया, युगोस्लाव्हिया, बल्गेरिया, तुर्कस्तान, इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि उत्तर–पश्चिम भारतातून भारतात पोहोचली. भारतात प्रवेश केल्यानंतर बस अखेर नवी दिल्ली, आग्रा, इलाहाबाद (प्रयागराज) आणि बनारसमार्गे कलकत्त्यात पोहोचली.

***सुविधांनीयुक्त आलिशान लक्झरीटूर –*** बसमध्ये प्रवाशांसाठी वाचनाची सुविधा होती. प्रत्येक प्रवाशासाठी झोपण्यासाठी वेगळे पलंग, फॅनद्वारे चालणारे हीटर आणि एक स्वयंपाकघर उपलब्ध होते. बसच्या वरच्या मजल्यावर पुढच्या बाजूस एक निरीक्षण कक्ष होता. हा साधा प्रवास नसून एक टूरच होती. बसमध्ये पार्टीसाठी रेडिओ आणि म्युझिक सिस्टिम होती. भारतातील पर्यटन स्थळांवर, जसे की बनारस आणि यमुना काठावरील ताजमहाल येथे वेळ घालण्यासाठी ही बस थांबत असे. तसेच, प्रवाशांना तेहरान, सॉल्झबर्ग, काबूल, इस्तंबूल आणि व्हिएन्ना येथे खरेदी करण्याची परवानगीही दिली जात असे.


गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक ब्लॅक अँड व्हाईट फोटो व्हायरल होत आहे. या फोटोमध्ये लंडनच्या व्हिक्टोरिया कोच स्टेशनवर काही प्रवासी लंडन ते कोलकाता या जगातील सर्वात लांबलचक कोच मार्गाच्या पहिल्या प्रवासासाठी रांगेत उभे असल्याचे दिसत आहे. हा फोटो १५ एप्रिल १९५७ साली टिपण्यात आला होता. बसवर लंडन – कलकत्ता – लंडन मार्ग असे लिहिण्यात आले होते. अनेक दशकांपूर्वी कलकत्त्याचे (आताचे कोलकाता) लोक बसने लंडनला गेले आणि परतही आले. १९५० च्या दशकात प्रवाशांना सेवा देण्यासाठी २१ वर्षे वापरण्यात आलेली ऐतिहासिक बस ङ्गअल्बर्टफ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. भारतातील हा प्रवास पाच दिवसांचा होता आणि एका तिकिटाची किंमत ८५ पौंड होती. परतीच्या प्रवासाची किंमत ६५ पौंड आहे. आज हेच भाडे एकेरी प्रवासासाठी सुमारे ७,९६३ रुपये आणि परतीच्या प्रवासासाठी ६,०८९ रुपये असू शकले असते. (यात चलनवाढ गृहीत धरलेली नाही) भारतातून जाणारा मार्ग दिल्ली, आग्रा, प्रयागराज, बनारस सारख्या शहरांमधून कोलकात्यापर्यंत पोहोचत होता.

***डबलडेक असलेली आलिशान अल्बर्ट टूर –*** अल्बर्ट बसमधून प्रवास करताना एखाद्याला लक्झुरीअस प्रवासाचा उत्तम आनंद घेता येत असे. खालच्या डेकमध्ये

रीडिंग आणि डायनिंग लाऊंज होते आणि वरच्या डेकमध्ये फॉरवर्ड ऑब्झर्व्हेशन लाऊंज होते. सर्व सोयींनी युक्त स्वयंपाकघर देखील होते. रेडिओ आणि रेकॉर्ड केलेल्या संगीताच्या साह्याने पार्टीची व्यवस्था करण्याची सोय आहे. काही वर्षांनंतर बसचा अपघात झाला आणि ती प्रवासासाठी अयोग्य ठरली. नंतर ब्रिटिश प्रवासी अँडी स्टुअर्ट यांनी ही बस खरेदी केली. त्यांनी या बसला दोन मजली फिरते घर म्हणून परिवर्तित केले. या डबल-डेकर बसला अल्बर्ट असे नाव देण्यात आले.

***१९७६ साली अखेरची बस सुटली*** – अल्बर्ट टूर्स ही कंपनी इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियामध्ये कार्यरत होती आणि ती लंडन – कलकत्ता – लंडन आणि लंडन – कलकत्ता – सिडनी या मार्गांवर सेवा पुरवत असे. ही बस इराणमार्गे भारतात प्रवेश करत असे आणि नंतर बर्मा, थायलंड आणि मलेशिया मार्गे सिंगापूरला पोहोचत असे. सिंगापूरहून बस जहाजाद्वारे ऑस्ट्रेलियातील पर्थ येथे नेली गेली आणि तिथून रस्त्याने सिडनीपर्यंत प्रवास केला. लंडन ते कलकत्ता या प्रवासाचा शुल्क १४५ पौंड होता. या सेवेमध्ये पूर्वीप्रमाणेच सर्व आधुनिक सुविधा होत्या. इराणमधील क्रांती आणि पाकिस्तान-भारत दरम्यान वाढलेल्या तणावांमुळे राजकीय परिस्थितीमुळे १९७६ साली ही सेवा बंद करण्यात आली. सेवा बंद होण्यापूर्वी अल्बर्ट टूर्सने कोलकाता ते लंडन आणि लंडन ते सिडनी असे सुमारे १५ प्रवास पूर्ण केले.

# इजिप्तची लेडी ऑफ दी हाऊस



जगाच्या इतिहासात इजिप्त हा नेहमीच आकर्षणाचा विषय राहिला आहे. नाईल नदीच्या किनाऱ्यावर विकसित झालेल्या या संस्कृतीने वसाहतवादी कालखंडात साऱ्या जगाचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले. मोठं मोठाले पिरॅमिड्स, त्यातील ममीज, सभोवतालचे विस्तृत पसरलेले वाळवंट यांनी नेहमीच या प्रदेशाच्या इतिहासाविषयी गूढता निर्माण केली. म्हणूनच या ठिकाणच्या इतिहासावर प्रकाश टाकणारे काही सापडले की, तो नेहमीच कुतूहलाचा विषय ठरतो. अलीकडेच याच इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या एका महत्त्वाच्या ममीचा शोध पुरातत्त्व अभ्यासकांना लागला आहे. २ ऑक्टोबर रोजी इजिप्तच्या पर्यटन आणि पुरातत्त्व मंत्रालयाने फेसबुकवर जाहीर केले की, असियुत प्रदेशाच्या प्राचीन राज्यपालाच्या मुलीचे थडगे असियुतच्या पश्चिम पर्वतावरील एका दफनभूमीत सापडले आहे. या मुलीची ओळख लेडी ऑफ दी हाऊस अशी करण्यात आली आहे. त्याच पार्श्वभूमीवर या शोधाचा घेतलेला हा आढावा.

या नव्याने उघडकीस आलेल्या थडग्याचे स्थान कैरोपासून सुमारे २४० मैल अंतरावर आहे. दफनात सापडलेल्या या महिलेचे नाव 'इडी' असे आहे. तिचे दफन दोन अत्यंत सुशोभित केलेल्या शवपेट्यांमध्ये करण्यात आले होते. एक शवपेटी दुसऱ्या शवपेटीच्या आत ठेवलेली होती, असे इजिप्तच्या पर्यटन आणि पुरातत्त्व मंत्रालयाकडून सांगण्यात आले आहे. या शवपेटीत सापडलेली इडी इजिप्तमध्ये इसवीसन पूर्व २०३० ते १६४० या कालखंडात होऊन गेली आणि अंदाजे ४० व्या वर्षी तिचा मृत्यू झाला, असे लाइव्ह सायन्सच्या अहवालात म्हटले आहे. UCLA इजिप्तोलॉजिस्ट कॅथलिन कुनी यांनी लाइव्ह सायन्सला सांगितले की, दोन अखंड मिडल किंगडम शवपेटीचा शोध लागणे हे विलक्षण आहे. ही शवपेटी मिडल किंगडमच्या (मध्यसाम्राज्यकाळ) कालखंडातील आहे.

***इजिप्तच्या इतिहासातील कालखंड*** – मराठी विश्वकोशात म. श्री. माटे यांनी म्हटल्याप्रमाणे, उत्तर आफ्रिका खंडात ईशान्येस नाईल नदीच्या खोऱ्यात इ. स. पू. ५००० ते इ. स. ६४० च्या दरम्यान अस्तित्वात असणारी एक प्राचीन समृद्ध संस्कृती म्हणजे इजिप्तची संस्कृती. तिचा विस्तार मुख्यत्वे नाईल नदीच्या खोर्यात उत्तरेकडील पहिल्या प्रपातापर्यंत व नाईलच्या त्रिभुज प्रदेशात झाला होता. नाईल हीच इजिप्तची अन्नदात्री आहे आणि प्रागैतिहासिक काळापासून इजिप्तचे जीवन तिच्याभोवतीच गुंफले गेले, म्हणून त्याला ङ्गनाईलची देणगीफ हे नाव प्राप्त झाले. त्याकाळी तत्कालीन लोकांनी इजिप्तचे उच्च अथवा दक्षिण व निम्न अथवा उत्तर असे दोन प्रादेशिक विभाग कल्पिले होते. आरंभी राजकीय दृष्ट्याही हे दोन स्वतंत्र प्रदेश होते व त्यांच्या एकीकरणानंतर इजिप्तचे साम्राज्य स्थापन झाले.

स्थूल मानाने इजिप्तच्या प्राचीन इतिहासाचे अभ्यासाच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे विभाग करण्यात येतात;


१) प्रागैतिहासिक काल : इ. स. पू. सु. ५००० ते ३२००,
२) प्राचीन काळ : इ. स. पू. सु. ३२०० ते २६६० : पहिला व दुसरा राजवंश,
३) प्राचीन साम्राज्यकाळ : इ. स. पू. सु. २६६० ते २१८० : राजवंश ३ ते ६,
४) पहिला मध्यकाळ : इ. स. पू. सु. २१८० ते २०८० : राजवंश ७ ते १०,
५) मध्यसाम्राज्यकाळ : इ. स. पू. सु. २०८० ते १६४० : राजवंश ११ ते १३,
६) द्वितीय मध्यकाळ : इ. स. पू. सु. १६४० ते १५७० : राजवंश १४ ते १७,
७) नवसाम्राज्यकाळ : इ. स. पू. सु. १५७० ते १०७५ : राजवंश १८ ते २०,
८) उत्तर साम्राज्यकाळ : इ. स. पू. सु. १०७५ ते ३३२ : राजवंश २१ ते ३०. या काळाच्या विभागणीबद्दल एकमत नाही. काही विद्वान २१ ते २५ राजवंश असा एक कालखंड मानतात व त्यानंतर सेत काळ (सव्विसावा राजवंश) आणि अस्तकाळ (राजवंश २६ ते ३०) योजतात. यांच्या कालनिश्चितीबद्दलही दुमत आहे,
९) ग्रीक अंमल व टॉलेमी शासन : इ. स. पू. ३३२ ते ३०,
१०) रोम व बायझंटिन यांचा अंमल : इ. स. पू. ३० ते इ. स. ६४०.

***इडी*** – शवपेट्यांवरील चित्रलिपींमध्ये इडीला घरातील मुख्य स्त्री (lady of the house) असे संबोधले आहे, असे लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजचे वोल्फ्राम ग्राजेत्स्की यांनी या संदर्भात सांगितले. फेसबुक पोस्टमध्ये इजिप्तच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले की, इडी असियुत प्रदेशाच्या राज्यपालाची एकमेव मुलगी होती. राजा स्नोसर्ट पहिला,

*जफाय–हबी* म्हणून ओळखला जात असे, त्याच्या राज्यकाळात ती होऊन गेली. त्यांनी असेही म्हटले आहे की, राज्यपाल प्राचीन इजिप्तमधील प्रदेशांचा एक महत्त्वाचा शासक होता आणि पिता आणि मुलगी यांना त्या काळातील इजिप्तमधील सर्वात मोठ्या गैर–राजघराण्यातील दफनभूमीत दफन केले होते.

दफन केलेल्या महिलेच्या कवटी आणि हाडांच्या अवशेषांच्या प्राथमिक तपासणीत असे लक्षात आले की, तिचा मृत्यू वय वर्षे ४० च्या आतच झाला होता. तसेच तिच्या पायात जन्मजात दोष होता. इजिप्तच्या सर्वोच्च पुरातत्त्व परिषदेचे सरचिटणीस डॉ. मोहम्मद इस्माईल खालेद यांच्या मते, इडीच्या दफन कक्षाचे खोदकाम केले असता असे आढळले की, उत्तरेच्या बाजूला सुमारे १५ मीटर (४० फूट) खोलीवर दोन शवपेट्या एकात एक ठेवलेल्या होत्या. त्या आतून आणि बाहेरून पूर्णपणे कोरलेल्या होत्या, ज्यावर मजकूर कोरलेला देखील आहे. लहान शवपेटी ७.५ फूट लांब होती, तर मोठी शवपेटी ८.५ फूट लांब होती. असेही आढळून आले की, प्राचीन काळात चोरांनी शवपेटीच्या चेंबरमध्ये प्रवेश केला आणि इडीची ममी (शव) फोडली. स्वच्छतेचे कार्य आणि हाडांवरील वैज्ञानिक अभ्यास राज्यपाल आणि त्याच्या मुलीबद्दल आणि तत्कालीन ऐतिहासिक युगाबद्दल अधिक माहिती प्रकट करत राहतील, असे परिषदेच्या निवेदनात म्हटले आहे.

# ब्लू झोन




जगामध्ये असे काही भाग आहेत, की जिथे लोक दीर्घायुषी आहेत. या भागांना ब्लू झोन म्हटले जाते. अमेरिकेतील डॅन बटनर यांनी या संकल्पनेचा विस्तार करताना सखोल संशोधन केले. पण आता लंडनमधील संशोधक सॉल जस्टिन न्यूमन यांनी या संकल्पनेला आव्हान दिले आहे. आकडेवारीनुसार जगातील दीर्घायुषी लोक जगण्यास प्रतिकूल अशी स्थिती जिथे आहे, अशा गरीब भागांत आढळून येतात असा दावा करून जन्म–मृत्यूच्या नोंदींमधील त्रुटी अनेकदा कारणीभूत असते, अशी मांडणी त्यांनी केली आहे.

***ब्लू झोन कोणते?***

जगामध्ये असे काही प्रदेश आहेत, की तेथील लोक दीर्घायुषी आहेत. अगदी नव्वदी आणि शंभरीतही ते सक्रिय असतात. जपानमधील ओकिनावा, इटलीतील सार्डिनिया, कोस्टा रिकामधील निकोया, ग्रीसमधील इकारिया आणि अमेरिकेत कॅलिफोर्नियामधील लोमा लिंडा या भागांना साधारणपणे ब्लू झोन म्हटले जाते. ही संकल्पना इतकी लोकप्रिय आहे, की यावर पुस्तके, ओटीटीवर मालिका, दीर्घायुषी होण्यासाठी इतर शहरांना ब्लू झोन प्रमाणपत्र देण्याचे उपक्रम आदी बाबी आतापर्यंत झाल्या आहेत. वीस वर्षांपूर्वी, २००४ मध्ये ब्लू झोन संकल्पना मांडली गेली. एक्स्परिमेंटल गेरोंटोलॉजी या जर्नलमध्ये इटलीतील सार्डिनिया भागावर संशोधनपर लेख प्रसिद्ध झाला. बेल्जियममधील जनसांख्यिकी तज्ज्ञ मायकेल पौलेन आणि इटलीमधील भौतिकशास्त्रज्ञ गियानी पेस यांनी प्रथम ही संकल्पना मांडली. सुरुवातीला सार्डिनिया भागाचा त्यात उल्लेख केला होता. ज्या भागात दीर्घायुषी लोक अधिक राहतात, अशा ठिकाणी नकाशावर संशोधकांनी निळ्या रंगाने खुणा केल्या होत्या. त्यावरून याला ब्लू

झोन नाव मिळाले. त्यानंतरच्या वर्षात यामध्ये इतर भाग नमूद करण्यात आले. नॅशनल जिओग्राफिकमध्ये डॅन बटनर यांनी त्यावर एक वृत्त प्रसिद्ध केले. या संकल्पनेचा विस्तार बटनर यांनी केला. या विषयावर त्यांनी पुस्तके लिहिली. डॉक्युमेंटरी तयार केल्या. त्यांचा ब्लू झोन प्रकल्पही कार्यान्वित आहे. या संकल्पनेची व्याप्ती नंतर वाढत गेली. अधिकाधिक लोक या संकल्पनेकडे येऊ लागले. मुळातच जन्माला आलेले ठिकाण पर्यावरणदृष्ट्या उत्तम असणे यांसह उत्तम जीवनशैली, आहार, आयुष्याला असलेले ठरावीक ध्येय, कुटुंबाला प्राधान्य, निर्व्यसनी असणे, ताणतणावाचे व्यवस्थापन, उत्तम जनुके अशी काही कारणे यासाठी दिली जातात.

**न्यूमन यांचे संशोधन –** २०१९ मध्ये एका लेखामध्ये या संकल्पनेला आव्हान दिले गेले. सॉल जस्टिन न्यूमन या वरिष्ठ संशोधकाने त्यावर एक लेख लिहिला. न्यूमन हे युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन येथे सेंटर फॉर लाँजिटुडिनल स्टडीजमध्ये संशोधक आहेत. ज्या भागाला ब्लू झोन म्हणून ओळखले जाते, तेथील लोकांचे आयुर्मान सामान्यच असते, असा दावा या संशोधनात केला आहे. प्रशासनाच्या पातळीवर चुकीच्या नोंदींसह इतर कारणे त्यासाठी कारणीभूत असून, केवळ कागदावर हा शंभरीचा आकडा आहे. प्रत्यक्षात तेथील लोकांचा आयुर्मानाचा नाही, असा दावा करण्यात आला आहे. १९७० ते २०२१ या काळातील संयुक्त राष्ट्रांकडील मृत्यूसंदर्भातील आकडेवारीसह इतर जनसांख्यिकी साधनांचा आधार त्यांनी घेतला आहे. अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, इटली, जपानमधील शतायुषी लोकांचा डेटा त्यांनी तपासला. तसेच, कुठल्या भागात शतायुषी लोक अधिक राहतात, हे त्यांनी पाहिले. निवृत्तीवेतनाच्या नोंदी पाहिल्या. ब्लू झोन म्हणून जे भाग ओळखले जातात, त्याच्याशी विपरीत अशी माहिती त्यांना मिळाली. अविकसित देशांतील गरीब भागांतही दीर्घायुषी लोक राहतात, अशी आश्चर्यजनक माहिती त्यांना आढळली. दीर्घायुषी लोक असलेल्या ठिकाणांमध्ये केनिया, मालावी, पश्चिम सहारा असे भाग त्यांना आढळले. या ठिकाणी सरासरी आयुर्मान ६४ ते ७० वर्षांपर्यंतचे आहे. ब्रिटनमध्ये टॉवर हॅम्लेट या मागास भागात शतायुषी लोक ब्रिटनमधील इतर कुठल्याही भागापेक्षा अधिक राहतात, असे त्यांना आढळून आले. ङ्गजगामधील ११० वर्षांहून अधिक काळ जगलेल्या ८० टक्के लोकांची माहिती मी मिळविली असून, संबंधित लोक कुठे जन्माला आले आणि त्यांचा मृत्यू कुठे झाला, हे मी तपासले आणि विशेष म्हणजे ज्या ठिकाणी जगण्याची साधने पुरेशी नसतात, तेथील परिस्थिती बिकट असते, अशा ठिकाणी शंभरी पूर्ण केलेले लोक अधिक आढळून आले,फअसे ते सांगतात. साक्षरतेचे कमी प्रमाण, जन्म–मृत्यूंची नोंदी

ठेवण्यातील ढिसाळपणा विसाव्या शतकाच्या सुरुवातीला होता. किती तरी लोकांना ते नक्की किती वर्षांचे आहेत, हे सांगता यायचे नाही. अनेकांचे मृत्यू नोंदवले गेलेले नाहीत. त्यामुळे अनेक प्रकरणांत अशा शतायुषी नागरिकांच्या कुटुंबीयांना त्यांचे निवृत्तिवेतन दीर्घ काळ मिळत गेले. २०१० मध्ये जपानमध्ये २ लाख ३० हजार शतायुषी लोक बेपत्ता असल्याची माहिती जपानी सरकारने दिली. याचे मूळ कारण मृत्यूंची न झालेली नोंद असे असावे, असे न्यूमन सांगतात. ग्रीसमध्येही निवृत्तिवेतनाबाबतची अशीच माहिती जाहीर केली. ङ्गब्लू झोनफ संकल्पनेमागेही असेच काही तरी असावे, असे न्यूमन मानतात. ओकिनावा येथे २0२0च्या आकडेवारीनुसार, वजनवृद्धीचे प्रमाण अधिक असल्याकडेही न्यूमन लक्ष वेधतात.

बटनर यांची ब्लू झोन संकल्पना आणि न्यूमन यांचा आश्चर्यजनक असा विरोधी दावा या दोन परस्परविरोधी गोष्टींवर बटनर यांनी सांगितले, की न्यूमन यांनी केलेले दावे ब्लू झोन ज्या ठिकाणी नमूद केला आहे, तेथील प्रामुख्याने नाहीत. बटनर यांनी वापरलेली संशोधनाची पद्धत वेगळी असून, ब्लू झोन भागामध्ये अनेक भेटी त्यांनी दिल्या आहेत. अनेक माहितीच्या आधारे त्यांनी या प्रदेशातील लोकांच्या जन्माच्या नोंदी तपासल्या आहेत. जगातील इतर भागांचाही बटनर यांनी अभ्यास केला. ब्लू झोन कुठे आढळून येतात का, ते पाहिले. मात्र, त्यांच्या संशोधनाच्या निकषात असा कुठलाही इतर भाग बसत नसल्याचे त्यांनी सांगितले. जनसांख्यिकीच्या निकषांनुसार ब्लू झोनमधील आयुर्मानाची आकडेवारी पूर्ण तपासून घेतल्याचे बटनर यांनी सांगितले. मॉन्ट्रियल विद्यापीठातील जनसांख्यिकी विभागामधील सहयोगी प्राध्यापक नॅडिन औलेट यांनी सांगितले, की न्यूमन यांनी केलेले दावे नक्कीच अस्तित्वात आहेत. मनुष्य जितका अधिक जगेल, तितकी त्याच्या वयाची अचूक माहिती मिळणे कठीण जाते. मात्र, वयाचा विचार करता इतर अनेक निकषही तपासले जातात. केवळ जन्म मृत्यूंच्या नोंदी बघितल्या जात नाहीत. तसेच, डॉ. न्यूमन यांनी संशोधनासाठी वापरलेल्या काही पद्धतींवर त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ज्या ठिकाणी ङ्गब्लू झोनफअस्तित्वात आहेत, अशा ठिकाणी आता आधुनिक जीवनशैली येऊ लागली असून, तेथील लोकांची पारंपरिक जगण्याची पद्धत बाद होत असल्याचे निरीक्षण बटनर यांनी नोंदवले आहे. येथे आता फास्ट फूड ची रेस्टॉरंटही दिसत आहेत. त्यामुळे येत्या काळात ब्लू झोन अस्तित्वातच राहणार नाहीत, अशी अपेक्षा आहे, अशी प्रतिक्रिया बटनर यांनी दिली. ब्लू झोन संकल्पना वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाली नसल्याचेही दावे काही शास्त्रज्ञांनी केले आहेत.